आज दि० २६।१२।२०१७ ला प्रागतिक विद्यालय, सुर्जी अंजनगाव जि. अमरावती येथे स्व-खर्चाने स्वत: उपस्थित राहून शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी डॉ० संदीप एम. राऊत सर भारतीय महाविद्यालय, मोशी यांनी वै० गाडगे बाबा महाराज यांच्या विचारातून वैज्ञानिक दृष्टीकोन कसा असावा हे त्यांनी विचारातून सांगितले. आपल्या देशातील निरक्षरता, अस्वच्छता, डॉ. अब्दुल कलाम यांचे विचार संताचे संदेश दिला. श्री राऊत सरांनी गाडगेबाबांचे विचार व प्रचार करुन आपला देश महासत्ता कसा बनेल याविषयी भरपुर माहिती दिली. मी त्यांना भावी पुढच्या आयुष्याकरीता शुभेच्छा देतो व त्यांना सुयश इच्छीतो.

आपला विश्वासू.

स्थळ: प्रागतिक विद्यालय,
अंजनगांव सुर्जी

मुख्याध्यापक
प्रागतिक विद्यालय
सुर्जी अंजनगांव, जि. अमरावती

Paperkraft

अभिप्राय

आज दिनांक २६।१२।२०१७ ला सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय सुर्जी जि. अमरावती येथे स्व-खर्चाने स्वत: उपस्थित राहून शाळेतील सर्व विद्यार्थीनींनी व शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते डॉ० संदीप राम राऊत सर भारतीय महाविद्यालय मोशी यांनी वैराग्यमूर्ती गाडगे महाराज यांच्या विचारातून वैज्ञानिक दृष्टीकोन कसा असावा हे त्यांनी आपल्या प्रबोधनातून सांडले अंधश्रद्धा, निरक्षरता, हुंडा, कृषा कुप्रथा दारिद्र्यता, गरीबी यावर प्रकाश टाकला. राऊत सरानी वैचारिक प्रबोधन स्वच्छता, शिक्षण, प्राणिमात्रावर, "प्रबोधनातून मनोगत मांडले.

पुढील भावी आयुष्यात त्यांच्या प्रबोधनपर कार्यक्रमाकरीता सुभेच्छा देतो यश प्रदान होवो हि सदिच्छा

स्थळ:- सावित्रीबाई फुले
कन्या विद्यालय सुर्जी

Date 26/12/2017

मुख्याध्यापक
सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय,
सुर्जी अंजनगाव

Paperkraft

27/12/2017

अभिप्राय

आज दिनांक 27/12/2017 रोजी ज्ञानपीठ इंग्लिश मेडियम स्कुल व कनिष्ठ महा. अंजनगाव सुर्जी येथे स्व. बबनराव मेटकर स्मृति-प्रित्यर्थ प्रा. डॉ. श्री संदिप राऊत यांची विचार प्रबोधन मालिका आयोजित करण्यात आली. विषय होता - गाडगेबाबांची समाज प्रबोधन चळवळ. श्री राऊत व त्यांची चमू यांनी स्वखर्चाने स्वतः सर्व कार्यक्रमाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

संत गाडगेबाबा व त्यांचे विचार प्रा. डॉ. संदिप राऊत यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे शाळेतील विद्यार्थ्यांसमोर मांडले. आजच्या युगात भारताला महासत्ता बनविण्याची स्वप्ने रंगविणाऱ्या लोकांना स्वच्छता व विचारमुल्ये शिकविणाऱ्या संत गाडगेबाबांच्या जीवनावर श्री राऊत यांनी प्रकाश टाकला.

आजच्या काळात खरोखरच संत गाडगेबाबांचे विचार समाजात रुजविण्याचे काम करणाऱ्या श्री राऊत व त्यांचे सहकारी मंडळी यांच्या कार्यास आमचेकडून हार्दिक शुभेच्छा!

Dnyanpeeth English Medium School,
Anjangaon Surji, Dist. Amravati

Paperkraft

अभिप्राय

27.12.2017

आज दिनांक 27.12.2017 ला दुपारी 2.30 वाजता महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय विहीगांव ता. अंजनगाव सुर्जी. जि: अमरावती येथे प्रा. डॉ. श्री संदिप राऊत यांनी स्व. श्री बबनराव ~~प्रबोधन~~ मेटकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ [विचार प्रबोधन माला] 'गाडगेबाबा विचार प्रबोधन व समाज प्रबोधन चळवळ' या विषयावर व्याख्यान केले. त्यांनी चालु केलेली गाडगे बाबा विचार प्रबोधन चळवळीचा उपक्रम स्तुत्य आहे.

आपल्या सहज व सुंदर प्रेझेंटेशनने त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे मने जिंकुन घेतली. संत गाडगेबाबाच्या विचारांचे अमुल्य मोती त्यांनी विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविले.

गाडगेबाबांच्या विचाराची आजच्या समाजाला खुप आवश्यकता आहे हे त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. राउत सर व त्यांच्या सहकार्यांना महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

Principal
Mahatma Jyotiba Phule Jr. College
(H.S.C. Vocational Course)
Vihigaon, Ta. Anjangaon (Surji)

अभिप्राय

दि. 27/12/2017

आज दिनांक 27/12/2017 रोज बुधवार दुपारी 4.00 वाजता जनता विद्यालय उमरी बाजार ता. दर्यापूर जि. अमरावती येथे प्र. डॉ. श्री कौडिण्य साहेब यांनी स्व. श्री बळवंतराव मेटकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ (विचार प्रबोधन व मार्गदर्शन) प्रबोधन व समाज प्रबोधन चळवळ या विषयावर व्याख्यान दिले. यांनी चालू केलेली गाडगेबाबा विचार प्रबोधन चळवळीला उपयुक्त स्वरूप आहे.

आपला सहज व सुंदर आवाजोत्तीन यांनी विद्यार्थी व श्रोतृवर्गाचे मन जिंकून घेतले. संत गाडगेबाबांच्या विचारांचे आजच्या परिस्थितीत महत्व सांगितले. विद्यार्थी पर्यंत पोहोचविणे.

गाडगेबाबांच्या विचारांची आजच्या समाजाला खूप आवश्यकता आहे. हे यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. श्रोतृवर्ग व त्यांच्या सहकाऱ्यांनी यांचा योग्य फुल देऊन सत्कार विद्यालयात उमरी बाजार येथे केला.

मुख्याध्यापक
जनता विद्यालय, उमरी बाजार
ता. दर्यापूर, जि. अमरावती

Paperkraft

अभिप्राय

दि. 28/12/2017

आज दिनांक 28/12/2017 गुरुवार रोजी 92 वाजता श्री सुदेवराव अंधारे विद्यालय हनोडा ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथे श्री संदिप राऊत सर यांनी स्व. श्री बळवंतराव मेटकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ (विचार प्रबोधन कार्यक्रम) गाडगे बाबा विचार प्रबोधन व समाज प्रबोधन चळवळ या विषयावर व्याख्यान केले.

गाडगेबाबा विचार प्रबोधन चळवळीचे उपयुक्त मार्गदर्शन केले.

आपल्या सहज व सुंदर आवाजोत्तीन यांनी विद्यार्थी व श्रोतृवर्गाचे मन जिंकून घेतले संत गाडगेबाबांच्या विचारांचे आजच्या परिस्थितीत विद्यार्थी पर्यंत पोहोचविणे

मुख्याध्यापक
श्री. सुदेवराव अंधारे विद्यालय
हनोडा ता. अंजनगाव जि. अमरावती

Paperkraft

अभिप्राय

28/12/17

आज दिनांक 28/12/17 गुरुवारला 2 वाजता माध्यमिक विद्यालय बोराळा ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथे प्रा. डॉ. श्री संदिप राऊत सर व डॉ भैयासाहेब चिखले सर यांनी स्व. श्री. बबनरावजी मेरकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ (विचार प्रबोधन केले) गाडगे बाबा विचार प्रबोधन व समाज प्रबोधन चडवड या विषयावर व्याख्यान केले गाडगे बाबा याच्या चरित्रावर पुर्ण माहिती दिली

आपल्या सहज व सुंदर भाषणातुन त्यानी विद्यार्थी व शिक्षकाचे मते जिंकुन घेतली. सत गाडगे बाबा विचाराचे अमुल्य माहीती दिली गाडगे बाबा विषयी सपुर्ण माहीती दिली. विद्यालयाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय बोराळा
ता. अंजनगाव सुर्जी.

Paperkraft

अभिप्राय

दि. २८/३२/२०३७

आज दिनांक २८/३२/२०३७ लोजी आमच्या पंचफुलाबाई हरणे विद्यालय व कमवि. च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करता स्व. बबनरावजी मेरकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालिकेअंतर्गत संतगाडगे बाबाची समाज प्रबोधन चळवळ या विषयावर प्रबोधन केले ते प्रा. डॉ. संदिप एम. राऊत यांनी

या प्रबोधन यात्रे अंतर्गत प्रा. डॉ. संदिप राऊत यांनी संतगाडगेबाबांच्या कार्य-कर्तृत्वाचे वर्णन घडविले. त्यांच्या अभ्यासपूर्ण व चिंतनाशील व्याख्यानाने सर्वांना मंत्रमुग्ध करून सोडले.

त्यांच्या या प्रेरणादायी प्रबोधन यात्रेस त्युथरा चिंतुन धन्यवाद देते.

मुख्याध्यापक
पंचफुलाबाई हरणे विद्यालय
अंजनगाव सुर्जी.

Paperkraft

समाजोपयोगी कार्यक्रम

अभिप्राय. दिनांक २९/१२/२०१७

आज दिनांक २९/१२/२०१७ ला आमचे लक्ष्मणपुरी विद्यालय भंडारज ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथे सकाळी ११:३० वाजता स्व. बबनरावजी मेहकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालीके अंतर्गत 'संत गाडगे बाबांची समाज प्रबोधन चक्कवळ' या विषयावर डॉ. संदिप एम राउत यांची या मालीकेचे ५१ वे अंतिम पुष्प गुंफले.

संत गाडगे बाबा यांचे संपूर्ण जीवन हे समाजातील वाईट परंपरा, अंधश्रद्धा, स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांनी अर्पण केले. त्यांच्या जीवनातील अतिशय महत्वपूर्ण घटना व सुक्ष्म गोष्टी ह्या बहुतांश विद्यार्थ्यांना माहित नव्हत्या अशा सर्व बाबींवर डॉ. संदिप एम राउत यांनी परिपूर्ण प्रकाश टाकला.

त्यांच्या या समाजप्रबोधन, प्रेरणादायी यांचेस आमचे विद्यालयातर्फे हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद.

मुख्याध्यापक
श्री. रविंद्र गुणवंतराव कोकारे.
मु. ज्याध्यापक
लक्ष्मणपुरी विद्यालय, भंडारज,
ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

1) एस. जी. ककमकर -
2) श्री वाघमारे सर
3) प्रा. उं. मनोज सपकाळे —
4) प्रा. श्रीकृष्ण नवले
5) प्रा. उं. भैया सिरसाट
6) प्रा. घनश्याम दाणा

7) प्रा. मंगेश राठोड
8) प्रा. गौरव ठाकरे
9) प्रा. एस. मंडलिक भरकड | वाकोडे.
10) प्रा. रविंद्र कावरे - ९८२३८२७९९०
11) प्रा. जे. जी. गुजर
12) एस
13) पी. पी. हुरणे
14) पी. ए. हुरणे
15) कु. सी. डी. गावंडे
16) " एस. आर. हुरणे
17) कु. मनिषा पं. वाघाडे
18) चेतन डोंगरे
19) श्री डी. बी. अलिखडे
20) कु. एम. बी. वाकोडे
21) कु जे. जी गुजर
22) श्री सुरेश ना. कुकडे ९४०४१२०३
23) श्री. नारायण वि. पडोळे
24) राठोड
राहुल र. हरणे

भंडारज 29/12/2016

आज आदरणीय डॉ. सदीप राऊत यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमोर कर्मयोगी संत गाडगेबाबा विविध उदाहरणातून समजाऊन सांगितला स्व. बबन दादा मेटकर स्मृती प्रित्यर्थ प्रचार दौऱ्यात ५१ वा समारोपीय हा कार्यक्रम मी त्यांना शुभेच्छा देतो

(D.S. Wingh Mare)
29/XII/2016

Paperkraft

2018-19



।। सेवा परमो धर्मः ।।

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

भारतीय महाविद्यालय, मोर्शी



राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ

विचार प्रबोधन मालिका

वर्ष ६ वे (२०१८)

विषय : संत गाडगेबाबांची समाज प्रबोधन चळवळ

प्रमुख वक्ते :- डॉ. संदीप एम. राऊत रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी, भा.म.वि.मोर्शी

03/10/2015

अभिप्राय

भारतीय महाविद्यालय, मोर्शीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालिकेतंर्गत 6 संत गाडगे बाबांची समाज प्रबोधन चळवळ

या विषयावर डॉ. संदीप एम. राऊत रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी, भा.म.वि. मोर्शी जि. अमरावती यांनी आमच्या विद्यालयात (श्री लालदास स्वामी विद्यालय, हापोरी)

येथे आज दि. 3/10/2018, बुधवारला उपरोक्त विषयावर आपल्या अमोघ वाणीतून आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत गाडगे बाबांचे विचार, जीवन आणि कार्य समर्पक शब्दात पोहचविले, त्या बद्दल विद्यालयाच्या वतीने ऋण व्यक्त करतो व आपल्या या चळवळीस मनापासून शुभेच्छा प्रदान करतो. धन्यवाद!

I/C

(J. M. Tatte)

मुख्याध्यापक
श्री लालदास स्वामी विद्यालय
हापोरी, ता. मोर्शी, जि. अम

3/10/2018

अभिप्राय

भारतीय महाविद्यालय मोर्शीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेतकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालिकेअंतर्गत "संत गाडगे बाबाची समाज प्रबोधन चळवळ" या विषयावर डॉ. संदीप. ताम. पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी भारतिय महाविद्यालय मोर्शी. जि. अमरावती यांनी आमचे विद्यालयात (सातपुडा माध्यमिक विद्यालय पाला) येथे आज दि. 3/10/2018 बुधवारला उपरोक्त विषयावर आपल्या अमोघ वाणीतुन आमचे विद्यार्थिना बाबाचे विचार आणि कार्य समर्पक शब्दात पोहोचविले. आजच्या युगात या प्रबोधनाची अत्यंत गरज आहे. आपला उपक्रम निश्चीतच कौतुकास्पद आणि अभिनंदनिय आहे. आपल्या उपक्रमास मनापासुन शुभेच्छा प्रदान करतो. आपल्या प्रबोधनाचा विद्यार्थ्यांच्या मनावर निश्चीतच सकारात्मक परिणाम होईल. आपला अमुल्य वेळ आमचे विद्यालयाकरिता दिला आपला ऋणी आहे.

धन्यवाद!

Head Master
Satpuda Madhyamik Vidyalaya
Pala, Tp. Morshi Dist. Amravati

Paperkraft

अभिप्राय

भारतीय महाविद्यालय मोशी या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत व स्व. बबनरावजी मेमाडे स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन माहिती अंतर्गत "संत गाडगे बाबांची समाज प्रबोधन चळवळ" या विषयावर डॉ संदीप एस. राऊत राष्ट्रीय सेवा योजना ~~अभ्यासक्रम~~ अधिकारी भारतीय महाविद्यालय मोशी जि. अमरावती यांनी आमच्या विद्यालयात (महात्मा फुले माध्यमिक व उच्चमाध्य विद्यालय, हिरखेड) येथे आज दि. 8/10/2021 ला वरील विषयावर आपल्या अमोघ वाणीतून आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत गाडगे बाबांचे विचार, जीवन व कार्य अतिशय सुंदर शब्दात मांडले. त्या विचारांची खरोखरच आज गरज आहे. त्याबद्दल की त्यांचे विद्यालयातर्फे ऋणी आहे. त्यांनी जो अमूल्य वेळ आम्हाला दिला त्याबद्दल आभारी आहे.

धन्यवाद!

दि.
8 ऑक्टो 2021

[redacted]

सुमन्याहारी!

प्रा० सुभाष पारीसे
प्रमोद खसारे
सौ. संगीता व्ही. सरदार
सौ. संजया अ. टाक
सौ. मेघा वि. सोमकुंवर
रविन्द्र छ. साव
संजय रा. गेडाम
सुनिल र. नाईक great job sir
युवराज वासनकर
मोहन उपासे
सौ. बोबडे
कु. अनुराधा अ. फांजे

Sardar
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
Sanjay
A.A. Fanje

अभिप्राय

भारतीय महाविद्यालय मोर्शीच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत व स्वर्गीय बबनरावजी मेतकूर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन माहिती अंतर्गत संत गाडगे बाबा "समाज प्रबोधन चळवळ" या विषयावर डॉ. संदीप राउत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी भारतीय महाविद्यालय मोर्शी जि. - अमरावती यांनी आमच्या (सौ. गंगाबाई सी. चौधरी कन्या हायस्कूल, हिवरखेड ता. मोर्शी) येथे आज दि. ४/१०/२०१८ ला वरील विषयावर आपल्या अमोघ वाणीतून आमच्या विद्यार्थीनी पर्यंत गाडगे बाबाचे विचार, कार्य अतीशय चांगल्या प्रकारे मांडले. आज देशातील बालकांना, तरुणांना या विचाराची गरज आहे. आम्ही विद्यालयातर्फे त्यांचे आभारी आहो

त्यांनी आपला अमूल्य वेळ दिला विद्यार्थीनी मध्ये चांगल्या संस्काराचे बिज रोवल्याबद्दल

धन्यवाद!

मुख्याध्यापिका
सौ. गंगाबाई सी. चौधरी
कन्या हायस्कूल, हिवरखेड ता. मोर्शी

Paperkraft
Paperkraft

॥ अभिप्राय ॥ 05/10/18

भारतीय महाविद्यालया अभ्यंतर N.N.S. तर्फे डॉ. संदिप राउत यांचे संत गाडगेबाबा विचार प्रबोधन श्री. बबनरावजी मेरकर यांचे स्मुर्ती प्रित्यर्थ आपले ज्ञानदिप क.म.वि. (येरला) मोर्शी येथे आज आयोजित करण्यात आले.

डॉ. संदिप राउत यांनी आपले विचारातुन संत गाडगेबाबा विचार, कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडुन 'जिवंत' संत गाडगेबाबा समजुन सांगितले. त्यांच्या विचारातुन विद्यार्थ्यांना चांगल्या कार्याची शाश्वत प्रेरणा मिळाली.

आपल्या कार्यास हार्दिक शुभकामना!

शमश: आभार.

आपला विश्वासू

ज्ञानदिप क.म.वि. (येरला)
मोर्शी

Head Master/Principal
Dnyandeep Vidya Mandir &
Jujior College, Yerla, Tq. Morshi

// अभिप्राय //

भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील NSS विभाग प्रमुख प्रा. श्री संदीप राउत यांनी, एक बनवारजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालिका अंतर्गत विद्यार्थ्यांसमोर संत श्री गाडगे बाबा यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. विद्यार्थ्यांनी त्यांचे भाषण शांतपणे एकुण घेतले व त्यांच्या भाषणाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. त्यांच्या भाषणातुन विद्यार्थ्यांना प्रेरणाच मिळाली.

आपल्या या कार्याला विद्यालया तर्फे हार्दिक शुभेच्छा.

आपला विश्वासु

सं. वी. दिवे
महाराष्ट्र विद्यालय मोर्शी

प्र. ग. वां

MDSolanke
भीमगीमिता खोडके

S.S. Rahate

Paperkraft

अभिप्राय.

भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील NSS विभाग प्रमुख प्रा. श्री. संदीप राऊत यांनी स्व. बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालीका अंतर्गत आमच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबांचे विचार दिले.

आजच्या विज्ञानयुगात गाडगेबाबांच्या विचारांची कशी गरज आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. विद्यार्थी दिड तासापर्यंत शांतपणे विचार ऐकत होते.

त्यांच्या या उपक्रमाला आमच्या विद्यालयाकडून शुभेच्छा.

धन्यवाद.

दि. 09/10/2018.

आपला.

जे. एम. देशमुख
मुख्या. श्री. विवेकानंद विद्यामंदिर
शिरखेड.

1) श्री. एन. यू. चव्हाण
2) " एस. यु. देशमुख
3) कु. बी. डी. झाकडे
4) श्री. वि. वी. भलावी
5) श्री. ए. भार. वानखडे

Head Master
Shri Vivekanand Vidyamandir
SHIRKHED, Tq. Morshi

09/10/2018.

— अभिप्राय —

आज दिनांक 09/10/2018 ला भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. श्री. संदीप राऊत यांनी स्व. बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ "विचार प्रबोधन" मालीका अंतर्गत आमच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना संत गाडगे-बाबांचे विचार अनेक उदाहरणे देवून स्पष्ट करून सांगितले.

आजच्या विज्ञानयुगात जागतीकीकरणाच्या युगात गाडगेबाबांच्या विचारांची कशी गरज आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून पटवून देवून त्यांचे विचार व्यक्त केले. विद्यार्थी दिड-दोन तासापर्यंत शांतपणे मंत्रमुग्ध होवून ऐकत होते.

त्यांच्या या उपक्रमाला आमच्या विद्यालयाकडून हार्दीक शुभेच्छा!

धन्यवाद.

आपला,
I/C.

1. श्री. ए. भार. वानखडे
2. कु. एस. जी. श्रीवास
3. कु. एस. एस. पारीसे
4. श्री. एस. व्ही. पिंपे
5. श्री. पी. एम. बुले.
6. श्री. एम. एस. नागदेवे
7. श्री. यु. एस. चव्हाण

Paperkraft
Paperkraft

8) श्री. निलेश रायपूरा - N.C. Raucharan
9) श्री. एस. बी. बोंडे.
10) श्री. एस. बी. वर्धे. - [signature]
11)

आज दि० १०-१०-२०१८ रोजी साफल्य विद्यालय सावरखेड येथे दुपारी ठिक १.०० वा. श्री संत कर्मयोगी गाडगे महाराज यांचे जीवनावर विचार व्यक्त करण्यात आले. स्व. श्री. बबनराव मेटकर यांचे स्मृती प्रित्यर्थ ही व्याख्यान माला विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त असून ही व्याख्यानमाला अविरत सुरु राहावी ही शुभेच्छा.

दि० १०-१०-२०१८

[signature]

मुख्याध्यापक
साफल्य विद्यालय, सावरखेड
ता. मोर्शी. जि. अमरावती

1) श्री एस. एन. जाणे - [signature]
2) " एन. बी. सुळे - [signature]
3) " आर. बी. मालपे - [signature]
4) " बि. ओ. ठाकुर - [signature]
5) " पि. बि. मडके - P.B. Madhe

जाहीर है [illegible] 2018 ची पहिली तिमाही
करता विद्यालय परीक्षेच्या रंगे धुपारी ठीक ४.०० वाजता पहिली मराठी मातृभाषा परंपरा विद्यालय
आपले विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व्यवसायिक आणि पहिली बहिणाबाई
चौधरी यांची स्मृतिदिवस आणि पहिली बहिणाबाई
यांच्या स्मृतिदिवस" हा कार्यक्रम साजरा
करण्यात आला. ही व्याख्यानमाला विद्यालय
आपल्या उपयुक्त उपक्रमांच्या कार्यक्रमात ही व्याख्यानमाला
माला" आयोजित करण्यात आली होती.

ही 10.10.18
उपस्थित शिक्षक वर्ग
कु. आर. यु. देशमुख मॅडम —
श्री. नाना के. ठाकूर सर. श्री —
कु. वंदना पांडे मॅडम —

Kuf Deshmukh
Head Mistress
Shri Vivekanand Kanya Vidyalay
Nerpinglai, Tq. Morshi, Dist. Amravati

आज दि. १०.१०.१८ ला दुपारी ४.०० ला जनता विद्यालय, नेरपिंगलाई येथे स्व. श्री बबनराव मेश्कर यांचे स्मृति प्रित्यर्थ मा. डॉ. संदिप एम राउत रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी भारतीय महा. मोर्शी जि. अम. यांनी 'संत गाडगे बाबांची समाज प्रबोधन चतुरंग' या अभिकेतंगत संत गाडगे बाबा यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान दिले. सदर व्याख्यान विद्यार्थ्यांनासाठी अत्यंत उपयुक्त असे आहेत. मा. संदिप राउत यांनी अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना गाडगे बाबांचे सामाजिक विचार पटवून दिले. त्यांच्या व्याख्यानमालेला व त्यांच्या समाज प्रबोधना - लेखु चतुरंगीत मनापासून शुभेच्छा देतो.
वरील यांची ही चतुरंग अविरतपणे होत राहावी ही अपेक्षा.

जनता विद्यालय नेरपिंगलाई
दि. १०/१०/१८.
उपस्थित शिक्षकेतर वर्ग
① डी. एस. खेरडे. - DKhedke
② श्री. एस. एस. देशमुख. SShmukh
③ कु. ए. एस. डवरे - Dware
④ कु. एस. एम. रोडगे
⑤ सौ. जे. एस. कांडारकर
⑥ कु. C. D. Takale

V.N.Ingole
(Shri V.N. Ingole)
मुख्याध्यापक
जनता विद्यालय, नेरपिंगलाई
ता. मोर्शी, जि. अमरावती

Paperkraft

कु. के. एस. पावडे

Sall. Pralima Vismay Thakre

Shri Huddeshwar Laxmanrao Bodkhe

छान व्याख्यान By Rast Sir

Shri P. V. Thakare

Ku. A. D. Tayade

आज दि 10/10/2018 ला सायं. 6.00 वाजता कृष्णकमल आदि आश्रम शाळा नेरपिंगळाई ता. मोर्शी येथे स्व. बबनरावजी मेटकर यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. संदीप एस. राऊत सर. रा. सो. यो. कार्यक्रम अधिकारी भारतीय महा. मोर्शी यांनी 'गाडगे महाराजांची समाज प्रबोधन चळवळ' या मस्तिकेअंतर्गत संत गाडगेबाबा यांचे जिवन चारित्र्यावर व्याख्यान दिले.

सदर व्याख्यान बाल विद्यार्थ्यास अतिशय उपयुक्त स्वरूपाचे आहे. मा. संदीप राऊत सर यांचे मार्गदर्शन उपनिषय सोप्या शब्दातून असल्याने बालकांस समजण्यास सरळ आहे.

यांच्या व्याख्यान मालेस व त्यांच्या समाज प्रबोधन कार्यक्रमास शुभेच्छा

दि. 10/10/2018

मुख्याध्यापक
कृष्णकमल अनु. आदिवासी
आश्रम शाळा, नेरपिंगळाई
ता. मोर्शी, जि. अमरावती

आज दि. ११.१०.२०१८ रोज गुरुवारला दुपारी ३=०० वाजता डॉ. आबासाहेब खेडकर विद्यालय, खेड ता. मोर्शी येथे स्व. बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ डॉ. संदिप एस. राउत सर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी भारतीय महा. मोर्शी यांनी "संत गाडगेबाबा समाज प्रबोधन चळवळ" या मालिके अंतर्गत संत गाडगेबाबा यांचे जिवण चरित्र्यावर व्याख्यान दिले.

सदर व्याख्यान बाल विद्यार्थ्यास अतिशय उपयुक्त स्वरुपाचे आहे. मा. डॉ. संदिप एस. राउत सर यांचे मार्गदर्शन अतिशय सोप्या शब्दातुन असल्याने बालकांना समजण्यास सरळ आहे.

त्यांच्या व्याख्यान मालेस व त्यांच्या समाज प्रबोधन कार्यक्रमास शुभेच्छा!

सदर समाज प्रबोधन कार्यक्रमास संस्थेचे संस्थेचे संस्थापक/व्यवस्थापक मा. श्री डॉ. के. जी. घोटे साहेब संस्थेचे सदस्य मा. श्री डॉ. नवजिवन कृ. घोटे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री अ. एन. घोटे सर तसेच सर्व शिक्षकांचे उपस्थित होते.

मुख्याध्यापक
डॉ. आबासाहेब खेडकर विद्यालय
खेड, ता. मोर्शी, जि. अमरावती

व्यवस्थापक
डॉ. आबासाहेब खेडकर विद्यालय
खेड, ता. मोर्शी, जि. अमरावती

दि. ११.१०.२०१८

आज दि. ११.१०.२०१८ रोज गुरुवारला दु. ४.१५ श्री रामविलास मुंधडा हायस्कूल, उदखेड ता. मोर्शी येथे स्व. बबनरावजी मेटकर स्मृति प्रित्यर्थ डॉ. संदिप एस. राउत सर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी भारतीय महा. मोर्शी यांनी "संत गाडगेबाबा समाज प्रबोधन चळवळ" या मालीके अंतर्गत संत गाडगेबाबा यांचे जिवण चरित्र्यावर आपले विचार व्यक्त केले.

डॉ. संदिप राउत सर यांनी अतिशय प्रगल्भतेने गाडगे महाराजांचे विचार आमच्या विद्यार्थ्यांसमोर प्रगट केले. अश्याच विचारांची आज समाजाला गरज आहे. त्यांच्या एक तासाच्या व्याख्यानामधे त्यांनी या देशाच्या अनेक समस्यांवर प्रकाश टाकला. सर्व विद्यार्थी व शिक्षक प्रभावी झाले.

त्यांनी हे जे समाज प्रबोधनाचे कार्य सुरु केले त्यास मानाचा मुजरा करतो व शुभेच्छा व्यक्त करतो की परमेश्वर त्यांच्या कडून हे कार्य अखंडपणे करण्यास त्यांना शक्ती प्रदान करो.

धन्यवाद.

मुख्याध्यापक
श्री रामविलास मुंधडा हायस्कूल

व्याख्याना कुरीता खालील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

१) श्री रास राम धोटे मुख्या
२) श्री दि. मा. शर्मा श.शि
३) सौ. रास. के. गांधी स.शि
४) श्री आर. आर. खैरकर कला शिक्षक
५) श्री वाय. जी. सलामे स.शि.
६) श्री अतुल पचारे स.शि A.B.Pachare
७) सौ. पि. रान. वाराणे स.शि
८) श्री रान. जे. डागा प्र.व.
९) श्री पी. डी. वानखडे
१०) सौ. पुजा ठाकरे.

Thakare

गाडगेबाबा हे प्रवचन करणारे संत नाहीत तर कृतिशील समाज सुधारक आहेत आणि त्यांचं हे रूप शाळेतील विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे, हा विचार करून संदीप राऊत यांनी प्रबोधन मालिका सुरू झाली. आतापर्यंत मोर्शी, वरुड, चांदूर बाजार, तिवसा, अचलपूर, दर्यापूर व अंजनगाव या तालुक्यातील २५५ शाळेमध्ये त्यांनी गाडगेबाबा आणि त्यांचे विचार पोहचवले.



गाडगेबाबांच्या विचारांचे शिलेदार...!

असं म्हणतात की महापुरुषांना रक्ताचे नाही तर विचारांचे वारसदार असतात . गाडगेबाबांच्या प्रबोधनाच्या विचारांचा वारसा चालवत आहेत भारतीय विद्यालय मोर्शीचे इतिहास विभाग प्रमुख प्रा डॉ संदीप राऊत आणि त्यांचे सहकारी. प्राध्यापक म्हणजे नोकरी आणि घर या चौकटीत रमलेला माणूस असतो. पण राऊत सर याला अपवाद आहेत .सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सरांना सामाजिक भान आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा घरूनच मिळाला आहे. सरांच गावं दर्यापूर तालुक्यातील उपराई. या गावामध्ये पशुबळी देण्याची प्रथा होती. अस सांगतात की त्यामुळे एवढी हिंसा व्हायची की नदीच पात्र पूर्ण लाल व्हायचे .गाडगेबाबा १ एप्रिल १९५४ ला या गावात आले आणि त्यांनी गावातील लोकांचं प्रबोधन केलं आणि हा हिंसाचार थांबवला. ही गोष्ट अनेक प्रकाराने सरांनी लहानपणी ऐकली यामुळे गाडगेबाबांविषयी त्यांच्या मनात आकर्षण निर्माण झाले. गाडगेबाबा कसे असतील याविषयी उत्सुकता निर्माण झाली आणि आपण त्यांना भेटू शकलो नाही याची खंतही निर्माण झाली. मात्र त्यातूनच गाडगेबाबा अधिक समजून घेणे आवश्यक आहे असे सरांना वाटू लागले.

त्यातून इतिहासात एम.ए. पूर्ण केल्यानंतर पी. एचडी. साठी त्यांनी विषय निवडला-'संत गाडगेबाबा यांचे सामाजिक कार्यातील योगदान -एक ऐतिहासिक मागोवा'

हा अभ्यास करत असताना त्यांनी गाडगेबाबांविषयी अनेक पुस्तक वाचली. पण त्या अभ्यासातून एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली . ते सांगतात. 'गाडगेबाबा पुस्तकात सामावू शकत नाही तो या मातीत रुजतो आणि मातीतून उगवतो. माणसाच्या मनात वसतो. सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीचा आवाका लक्षात घेऊन साधी सोपी उदाहरणे देऊन विचार करायला लावणारे गाडगेबाबा विलक्षण आहेत.' गाडगेबाबा देव दगडात नाही हे सांगतात तेव्हाच ते दशसूत्रीसारखा कृती कार्यक्रमही देतात

वेळी अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा, शिक्षण, ची शुश्रुषा, सार्वजनिक लोकहिताची बांधकामे अनेक कामे करतात. हे सर्व कार्य करणारे गाडगेबाबा आजच्या ढोंगी संतांपेक्षा कितीतरी वेगळे आहेत आणि हे समाजापर्यंत पोहोचले पाहिजे असे वाटू लागले.

याचदरम्यान सरांची ओळख झाली अमरावतीचे माजी आमदार बबनराव मेटकर यांच्याशी. गाडगेबाबांचे सच्चे अनुयायी होते. त्यांनी बाबांचे विचार समाजात पोहचवण्याचे व्रत अंगिकारले होते. त्यांनी पुढाकार घेऊन गाडगेबाबा यांच्या नावाने १९९५ ला अमरावती विद्यापीठात संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र तयार केले. ज्यामध्ये गाडगेबाबांच्याविषयी सर्व पुस्तके,फोटोची प्रदर्शनी आहे आणि ते स्वतःही अनेक प्रबोधनपर व्याख्यान गावागावात देत असत .यांच्या प्रबोधनाच्या अनेक कार्यक्रमात राऊत सर सहभागी झाले परंतु ६ एप्रिल २०१३ ला अल्पशा आजाराने बबनराव मेटकर यांचा अचानक मृत्यू झाला आणि आता हे प्रबोधनाचे कार्य थांबते कि काय ? अशी परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा डॉ संदीप राऊत यांनी पुढाकार घेऊन बबनराव मेटकर स्मृतिप्रीत्यर्थ विचार प्रबोधन मालिका सुरू केली जी सलग ५ वर्ष चालू आहे.

गाडगेबाबा प्रवचन करणारे संत नाहीत तर कृतिशील समाज सुधारक आहेत आणि त्यांचं हे रूप शाळेतील विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे. हा विचार करून ही प्रबोधन मालिका सुरू झाली. आतापर्यंत मोर्शी ,वरुड, चांदूर बाजार ,तिवसा, अचलपूर, दर्यापूर व अंजनगाव या तालुक्यातील २५५ शाळेमध्ये त्यांनी गाडगेबाबा आणि त्यांचे विचार पोहचवले. यांची काम करण्याची पद्धत जगावेगळी आहे. २-३ महिने आधी नियोजन सुरू होतं, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाना पत्र पाठवले जाते व त्यांच्या संमतीने तारीख वेळ निश्चित केली जाते आणि ठरलेल्या वेळेचं आधीच ही मंडळी हजर असतात. स्वागत करण्यासाठी पुष्प आणि गाडगेबाबांचा फोटो



सुद्धा..! ही मंडळी शाळेतील शिक्षकांचे स्वागत स्वतःच करतात आणि मग गाडगेबाबांच्या जीवनातील विविध पैलू उलगडण्याचे काम विद्यार्थ्यांच्या पुढे केले जाते. राऊत सरांच्या ओघवत्या वक्तृत्व शैलीने मुलांपुढे गाडगेबाबा उभे राहतात,त्यांच्या आयुष्यातील प्रसंग जिवंत होतात. कार्यक्रम संपताच ही मंडळी पुढच्या शाळेकडे निघून जातात .कुठलाही बडेजाव नाही ,आपण काहीतरी मोठे काम करतोय याचा अहंकार नाही आणि प्रसिद्धीही नाही. काही शाळा कार्यक्रम आयोजनास नकार देतात, यांचा काही राजकीय उद्देश तर नाही ना म्हणून शंका घेतात पण या सर्वाचा यांना राग किंवा आकस ही नाही..पण आता चित्र बदलतंय. प्रारंभी विरोध करणारी लोक त्यांना मदत करू इच्छितात. सुरवातीला शंकेनी पाहणारी लोक सुद्धा हातभार लावताहेत आणि हे कार्य सुरू राहीले पाहिजे अश्या शुभेच्छा देताहेत.

राऊत सर म्हणतात, गाडगेबाबा यांचे कार्य मार्ग दाखवणाऱ्या दीपस्तंभासारखे आहे. आज आपण एकविसाव्या शतकात जगत असतांना व भारत महासतेच्या दिशेने वाटचाल करत असताना समाजात

अंधश्रद्धा, निरक्षरता, व व्यसनाधीनता प्रचंड प्रमाणात वाढत आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या आदी अनेक समस्या देशापुढे मोठ्या प्रमाणात आहे.या गर्तेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी गाडगेबाबांच्या लोककल्याणकारी विचाराची गरज आहे. आणि या विचाराला कृतीची जोड देणं सुद्धा तेवढंच आवश्यक आहे. सर राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख आहेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने त्यांनी पाणी अडवण्याचा दृष्टीने बंधारे बांधले, मोर्शी येथील बसस्थानक, उपजिल्हा रुग्णालय, विविध कार्यालयाचे परिसर कितीतरी वेळा स्वतःच विदयार्थ्यांना सोबत घेऊन स्वच्छ केले.

आजच्या काळामध्ये जेव्हा मानवी मूल्य लोप पावतात की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. समाजसेवा हा गल्लेभरू व्यवसाय झाला आहे आणि झाडू मारणे म्हणजे फोटो काढण्याचा इव्हेंट अशावेळी डॉ.संदीप राऊत सर आणि त्यांचे सहकारी प्रा.घनश्याम दाणे, प्रा.मनोज वाहने, डॉ.भैया चिखले, डॉ. दया पांडे, डॉ सुभाष मुरे, प्रा.स्वप्नील देशमुख, रूपेश वाळके, प्रा.गौरव मेश्राम, प्रा.प्रवीण नवले, प्रा.मनोज सपकाळ, राहुल हगवणे, प्रा.प्रशांत कोकणे, योगेश मानकर, सुशील ढोले, गजानन कावळे जे काम करताहेत. ते एक आश्वासक चित्र निर्माण करते. गाडगेबाबां चे अनुयायी म्हणवून घेणारे गाडगेबाबांची जयंती आणि पुण्यतिथीला सत्यनारायणाची पूजा घालतात आणि दुसरीकडे ही मंडळी गाडगेबाबांचा विचार, समाजापर्यंत पोहचवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत, ही गौरवाची बाब आहे.



▪ डॉ.आशिष लोहे
७७७५८६०५८१

लेखक हे नामवंत रेडिओलॉजिस्ट व सामाजिक कार्यकर्ते आहेत



संत गाडगेबाबांना विनम्र अभिवादन

अश्विन रा. पोच्छी अमरावती	**युवराज म्हेत्रे** गटविकास अधिकारी,नेर
धनराज कि. इंगोले अमरावती	**राजेंद्र ना.भारती** नेर
सतिश प्र. सोमवंशी अमरावती	**योगेंद्र ज्ञा. खोडे** अमरावती
संजय अ. पवार यवतमाळ	**मिथुन राठोड** बाणगांव
दिलीप मारकंडे चंद्रपुर	**इंजि.सागर चव्हाण** पाथ्रड(गोळे)
जगदिश खाडे यवतमाळ	**मिथुन मोंढे** पिंपरी इजारा
संजय खरात अमरावती	**दिपक आडे** नेर
चंदु देशमुख नेर	**प्रदीप नाईकर** नेर
विवेक खडसे जिल्हा माहिती अधिकारी,भंडारा	**डॉ.सुचेता पाटेकर** शिक्षणाधिकारी,यवतमाळ
सुधीर मांडुळकर पिंपळगांव(काळे)	**नामदेव धान्य भंडार** प्रो.प्रा.ज्ञानेश्वर दरोई नेर

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi



।। सेवा परमो धर्मः ।।

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित



भारतीय महाविद्यालय, मोर्शी

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ

विचार प्रबोधन मालिका

प्रति,

मुख्याध्यापक,
श्री. विवेकानंद विद्यामंदिर
शिरखेड, ता. मोर्शी जि. अम.

विषय : विचार प्रबोधन मालिकेचे आयोजन करणेबाबत.

महोदय,

संताचे कार्य हे दिपस्तंभाप्रमाणे आहे. समाजाला सन्मार्ग दाखविण्याचे कार्य संतानी केले आहे. आज आपण एकविसाव्या शतकात जगत असताना व भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असताना समाजात अंधश्रध्दा, अस्वच्छता, निरक्षरता व व्यसनाधिनता प्रचंड प्रमाणात वाढत आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वृध्दाश्रमाचे वाढते प्रमाण व दारिद्रयाचे संकट यासारख्या अनेक समस्या देशापुढे मोठ्या प्रमाणात आहे. या गर्तेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी गाडगेबाबांच्या विचाराची गरज लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ 'विचार प्रबोधन मालिके' अंतर्गत **२७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०१८** या कालावधीत ५१ विचार पुष्पांचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर विचार प्रबोधन मालिका सन २०१३ पासुन सुरू करण्यात आली असुन मागील ५ वर्षामध्ये मोर्शी, वरूड, चांदुर बाजार, तिवसा, अचलपुर, अंजनगांव व दर्यापुर तालुक्यातील २५६ शाळांमध्ये विचार प्रबोधन मालिके अंतर्गत विचारपुष्पांचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले होते.

यंदा सलग सहाव्या वर्षीही मोर्शी तालुक्यातील २५ शाळां व २६ गावांमध्ये विचारपुष्पांचे आयोजन केले जाणार आहे.

सदर प्रबोधन मालिकेचा विषय : **''संत गाडगेबाबांची समाज प्रबोधन चळवळ''** हा आहे. संत गाडगे बाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा व त्यांचे विचार विद्यार्थी व समाजापर्यंत पोहचावेत या हेतुने आपल्या शाळा, महाविद्यालय व गावांमध्ये दि. ०५ / १० / २०१८ या तारखेला कार्यक्रमाचे आयोजन करावे ही नम्र विनंती

सदर कार्यक्रमास आपले सहकार्य अपेक्षित.

धन्यवाद !

वेळ : 3.30 वा OC

Received.

मुख्याध्यापक
श्री विवेकानंद विद्यामंदिर, शिरखेड
ता. मोर्शी, जि. अमरावती

आपला नम्र

डॉ. सदिप एम. राऊत
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
जि. अमरावती
मो. नं. ९८२२५५४५११/९४०४६८९७८३



।। सेवा परमो धर्मः ।।

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

भारतीय महाविद्यालय, मोर्शी



राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ

विचार प्रबोधन मालिका

वर्ष ६ वे (२०१८)

विषय : संत गाडगेबाबांची समाज प्रबोधन चळवळ

प्रमुख वक्ते :– डॉ. संदीप एम. राऊत रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी, भा.म.वि.मोर्शी

१) स्थळ :– श्री. विवेकानंद कन्या विद्यालय, नेर पिंगळाई

२) दिनांक :– 10-10-2018 ३) वेळ :– 2.30 – 3.30.

४) कार्यक्रमाकरीता उपस्थित मान्यवर

कार्यक्रमाचे अध्यक्ष:– मा. कु. एस. जी बारापात्रे मॅडम

प्रमुख अतिथी :– मा. कु. आर. यु. देशमुख मॅडम.
मा. वाय. जी. तट्टे सर.

प्रमुख वक्ते :– मा. डॉ. संदीप एम. राऊत. (रा.से.यो. अधिकारी)
भारतीय महाविद्यालय, मोर्शी. जि. अम.

५) मान्यवरांच्या हस्ते श्री संत गाडगेबाबा व कै. बबनरावजी मेटकर यांच्या प्रतिमेचे पूजन , हारार्पण आणि दिप प्रज्वलन करतील.

६) मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत :–

(1) अध्यक्ष:– कु. एस. जी. बारापात्रे मॅडम —
(2) प्रमुख अतिथी – कु. आर. यु. देशमुख मॅडम —
(3) —"— वाय. जी. तट्टे —
(4) वक्ते प्रा. घनश्याम दाणे —

७) प्रास्ताविक :– प्रा. घनश्याम दाणे,

८) प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन :– डॉ. संदीप एम. राऊत (रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी, भा.म.वि.मोर्शी)

९) प्रमुख अतिथींचे मार्गदर्शन :–

१०) अध्यक्षीय भाषण :– मा. कु. एस. जी. बारापात्रे मॅडम.

११) आभार प्रदर्शन :– मा. प्रा. मनोज वाहाणे

१२) संचालन :– मा. डॉ. भेय्यासाहेब चिखले.

१३) विशेष सहकार्य :– प्रा. डॉ. चिखले, प्रा. दाणे, प्रा. वाहाणे
प्रा. मनिष गुडधे. विद्यार्थी – तडोकार, अमस्तरे, राहुल भाऊ,



बबनरावजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधन मालिका

विषय: संत गाडगेबाबांची समाजप्रबोधन चळवळ

प्रमुख वक्ते : डॉ. संदीप एम. राऊत, भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि.अमरावती



श्री संत गाडगेबाबांचा जीवनपट व बोधवचने

* श्री संत गाडगेबाबांचा संदेश *

भुकेलेल्यांना	– अन्न
तहानलेल्यांना	– पाणी
उघड्या नागड्यांना	– वस्त्र
बेघरांना	– आसरा
गरीब मुलांमुलींना	– शिक्षण
अंध,पंगु,रोग्यांना	– औषधोपचार
बेकारांना	– रोजगार
पशुपक्षांना	– अभय
गरीब तरूण, तरूणींचे	– लग्न
दुःखी व निराशांना	– हिंमत

हाच आजचा रोकडा धर्म आहे
हीच खरी भक्ती व देवपूजा आहे.
बापहो, आपल्या मुलाले शिक्षण द्या !
पैसे नाही म्हणाल तर जेवणाचे ताट मोडा
हातावर भाकरी खा
बायकोले लुगडं कमी भावचे घ्या
पण मुलाले शाळेत घातल्याविना राहू नका.

* गाडगेबाबांची बोधवचने *

- माय बाप हो ! ऐपतीपेक्षा जास्त पैका खर्चुन जीवनाच्या चिंध्या करून घेऊ नका.
- मेल्यास नवीन कपड्यात गुंडाळून नेऊ नका 'जित्यास चिंधी । मेल्यास नवीन गुंडी' हे मुर्दाड व पेन्शनशास्त्र सोडुन नवा जिता-जागता धर्म जागवा.
- स्वतः सोयऱ्याकडे (नातेवाईकाकडे) नेहमी जाऊ नका व स्वतःचे येथे त्यांना नेहमी येऊ देऊ नका.
- भांडी गहाण ठेवून पाहुण्यांना पाहुणचार करू नका जे असेल तेच खायला द्या.
- दुफळी करू नका जेथे दुफळी आहे ते ठिकाण राक्षसी आहे ! मरण मागा परंतु दुफळी करू नका.
- माय बाप हो ! नवीन कपड्याने प्रेताला हर्ष होत नाही किंवा जुना कपडा नेसविल्याने ते प्रेत रडत नाही.
- देव पाहिला नाही, देव दिसला नाही अन देव कोणाले दिसणार नाही.
- ज्याच्या अंगात अभिमान नसेल तर तो मनुष्य देव होतो.
- ज्या धन्याच्या अंतःकरणात दया असेल तो सत्पुरूष आहे.
- काटकसर हा सुखी संसाराचा पाया आहे.
- विद्यादान देणे, जीवदान देणे, भूमिदान देणे, स्वच्छता व चांगली व्यवस्था निर्माण करणे आणि जनसेवेकडे आपली शक्तियुक्ती लावने सर्वांना पवित्र करणारे क्षेत्र आहे. ईश्वर भक्ती यातच आहे.
- मजुरांनो दरमहा १ रू. शिल्लक ठेवून गावांत एक बँक काढा व तो पैसा खर्च करू नका, ह्या पैशात गरीबांची लग्न करा. त्यांचा छोटासा संसार ह्या पैशात घडवा.
- सावकाराचा काही काही अन्याय नाही. ससा आला की पारधी खातो. तोच अन्यायी आहे, जो सावकाराकडे जातो.
- ज्याचा साप दारू पिऊन सापडला त्यानं बापाचे नातं वालं ठेवून द्या. तो बाप नाही वैरी आहे अन् जा त्याच्या अंगावर घरा त्याची शेंडी अन काढा पायातला बुट, असा बडवा की धोतर भरविल्याशिवाय त्याला ठेवूच नका तर तुम्ही मुल, नाही तर तुम्हास खालमाने मेंढरं म्हटलं तरी चालेल !
- शिक्षण मनुष्याचा तिसरा डोळा आहे.

–: श्री संत गाडगेबाबांचा जीवनपट :–

प्रसंग/घटना/कार्य	गांव/शहर	दिनांक/माहे/सन
१) डेबूजींचा जन्म	शेंडगांव ता. दर्यापूर जि. अमरावती	२३/२/१८७६
२) वडील झिंगराजी जाणोरकर यांचा मृत्यू	कोतेगांव	१८८४
३) गाडगेबाबा चंद्रभानजी मामाकडे राहावयास आले	दापूरे ता. मुर्तिजापूर	१८८४
४) धनाजी खल्लारकर यांच्या कुंताबाई नावाच्या मुलीशी बाबांचा विवाह	कमलापूर	१८९२
५) प्रथम कन्या आलोकाबाई हिचा जन्म	दापूरे	१८९९
६) द्वितीय कन्या कलावतीचा जन्म	दापूरे	१९००
७) पुत्र मुद्गल यांचा जन्म	दापूरे	१९०२
८) सावकाराशी संघर्ष	शेतात	१९०४
९) गृहत्याग	दापूरे	१ फेब्रुवारी १९०५
१०) पुत्र गोविंद याचा जन्म	दापूरे	१९०५
११) गोरक्षण संस्थेची स्थापना	मूर्तिजापूर	१९०६
१२) ऋणमोचन यात्रेत नामसप्ताह व भंडाऱ्याची सुरूवात,अपंगांना अन्नदान	ऋणमोचन	१९०७
१३) पूर्णा नदीला पहीला घाट बांधला	ऋणमोचन	१९०८
१४) धर्मशाळा बांधली	मूर्तिजापूर	१९०८
१५) धर्मशाळा बांधली	उमरी	१९१२
१६) पत्र्याची परीट धर्मशाळा बांधली	ऋणमोचन	१९१४
१७) चोखामेळा धर्मशाळा	पंढरपूर	१९१७
१८) चि. गोविंदाचे लग्न	मुंबई, वरळी येथे	१९१९
१९) मराठा धर्मशाळा	पंढरपूर	१९२०
२०) अंधपंगू यांच्यासाठी सदावर्ताची सुरूवात	पंढरपूर	१९२१
२१) मातोश्री सखुबाईचा मृत्यु	झिंगला पिंगला	१ मे १९२२
२२) चि. गोविंदाचा मृत्यु	पूणे	५ मे १९२३
२३) परीट धर्मशाळेची स्थापना	पंढरपूर	१९२५
२४) नाशिक धर्मशाळा ट्रस्टची स्थापना	नाशिक	१९३०
२५) आळंदी धर्मशाळा ट्रस्टची स्थापना	आळंदी	१९३०
२६) आळंदी परीट धर्मशाळेची स्थापना	आळंदी	१९३०
२७) देहू धर्मशाळेची स्थापना व हिंसाबंदीची सुरूवात	देहू	१९३०
२८) दोन घाट बांधले	ऋणमोचन	१९३१
२९) अंधपंगु सदावर्त सुरू	नाशिक	१९३२
३०) दोन घाट बांधले	काटेपूर्णा नदीवर दोनद येथे	१९३७
३१) हिंसाबंदी	दोनद	१९३७
३२) आकुल धर्मशाळेची स्थापना	पूणे	१९४०
३३) परीट धर्मशाळेची स्थापना	त्र्यंबकेश्वर	१९४०
३४) चोखामेळा धर्मशाळेत वसतीगृहाची स्थापना	पंढरपूर	१९४२
३५) कल्हईवाला धर्मशाळेची स्थापना	त्र्यंबकेश्वर	१९४८
३६) चोखामेळा धर्मशाळा डॉ.आंबेडकरांच्या स्वाधीन	पंढरपूर	१९४८
३७) श्री. गाडगेमहाराज मिशन ही संस्था स्थापन	मुंबई	१९५२
३८) 'जनता जनार्दन' मासिकाची सुरूवात	मुंबई	१९५२
३९) नागरवाडी गोरक्षण व आश्रमशाळा स्थापन	नागरवाडी	१९५२
४०) गोरक्षण संस्था स्थापन	अचलपूर	१९५२
४१) गाडगेमहाराज विद्यालय स्थापन	मूर्तिजापूर	१९५२
४२) हिंसाबंदी	उपराई (जि.अमरावती)	१९५३
४३) गोरक्षण संस्था स्थापन	राहूरी	१९५३
४४) अंधपंगु सदावर्त	मुर्तिजापूर	१९५३
४५) गाडगेमहाराज वसतीगृह	नाशिक धर्मशाळा	१९५३
४६) जे.जे. हॉस्पिटल आवारात धर्मशाळेची स्थापना	मुंबई	१९५४
४७) आश्रमशाळा	राहूरी	९-८-१९५४
४८) पेढीनदीच्या पूलावर गाडगेबाबांचे महापरिनिर्वाण	वलगांव जि. अमरावती	२०-१२-१९५६
४९) अग्नीसंस्कार	गाडगेबाबा समाधी मंदीर, अमरावती	२१-१२-१९५६

(महेश प्रिंटर्स,मोर्शी)